# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०७/०४/२०२६ (मंगळवार )**

## मा. पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांच्यासाठी घेतली “ सर्व कर्मचारी संवाद बैठक” ( All Hands Meet)

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार आज दिनांक ०७/०४/२०२६ रोजी पोलीस भवन, नागपुर येथे मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस अधिक्षक कार्यालय, तसेच पोलीस मुख्यालय, नागपुर ग्रामीण जिल्हा येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांची **“ सर्व कर्मचारी संवाद बैठक ” (All Hands Meet) बैठक घेतली** . उपस्थित पोलीस अधिकारी/ अंमलदार यांच्या अडीअडचणी, कामकाजासंदर्भातील विविध मुद्दे तसेच नवनविन कल्पना या विषयांवर चर्चा करण्यात आली. उपस्थितांनी मांडलेल्या समस्यांची तसेच उपाययोजनांची मा. पोलीस अधिक्षक यांनी दखल घेतली. संबंधिताच्या तक्रारींचे त्वरित निराकरण करण्याचे निर्देश दिले. सदर बैठकीत पोलीस दलातील विविध पदावरील अधिकारी/ अंमलदार यांच्या अनुभवाचा उपयोग करून पोलीस दलातील कामकाजात येणाऱ्या अडचणींवर उपाय शोधणे, पोलीस दलाची कार्यक्षमता वाढविणे, शिस्त व समन्वय राखणे याबाबत चर्चा करण्यात आली.

सदर **सर्व कर्मचारी संवाद बैठकीस** श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण, पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पाटील,प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह), तसेच सर्व शाखेचे प्रभारी अधिकारी ,अंमलदार आणि पोलीस मुख्यालय येथील अधिकारी आणि अंमलदार उपस्थित होते.





# एसबीएल एनर्जी लिमिटेड, कंपनी राऊळगाव येथे पोलीस विभागाकडून उपलब्ध साठयाची करण्यात आली तपासणी

दिनांक ०७/०४/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हया अंतर्गत एसबीएल एनर्जी लिमिटेड, राऊळगाव येथील कंपनीत पोलीस विभागाकडून तपासणी मोहीम राबविण्यात आली. मा. श्री हर्ष ए. पोद्दार पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात श्री सागर खर्डे, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या नेतृत्वात श्री पोलीस निरीक्षक श्री. मनोज काळबांडे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कळमेश्वर यांनी एसबीएल एनर्जी लिमिटेड कंपनीचा स्टाफ सह **कंपनीतील मॅगझीनची तपासणी केली** . सदर तपासणीदरम्यान कंपनीतील उपलब्ध साठा (स्टॉक), साठा नोंदवही, संबंधित कागदपत्रे तसेच प्रत्यक्ष मालाची पडताळणी करण्यात आली. **कंपनीचे closing stock details sheet register प्रमाणे चेक केले असता तंतोतंत stock दिसून आला. दि. ०१/०३/२०२६ चे दुर्घटनेनंतर कंपनीमध्ये उत्पादनाचे काम बंद असून त्यापुर्वी झालेलया उत्पादनाचे वितरणाबाबत आज रोजी प्रत्यक्ष भौतीकरित्या साठयाची पडताळणी केली. असता PESO यांचे website वर उपलब्ध सीटप्रमाणे शेवटचे closing balance तंतोतंत आढळून आला. सुरक्षा रक्षक तसेव CCTV यंत्रणेची सुध्दा तपासाणी करण्यात आली.** यावेळी साठ्याबाबत सर्व बाबींची सखोल चौकशी करून नियमांचे पालन केले जात आहे किंवा कसे याची खात्री करण्यात आली.

सदर कारवाई ही औद्योगिक क्षेत्रातील व्यवहार पारदर्शक ठेवणे तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे या उद्देशाने करण्यात आली आहे

## अवघ्या १२ तासात मोबाईल चोरीचा गुन्हा उघड
## मोबाईल चोरी करणारा तसेच चोरीचा मोबाईल विकत घेणारा आरोपी निष्पन्न
## भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— पोलीस स्टेशन भिवापुर येथे दिनांक ०६/०४/२०२६ रोजी फिर्यादी श्रीधर ढेंगे, रा. थूटाणबोरी यांनी तक्रार दिली की, आरोपी नामे उत्तम लेकुरवाळे, रा. थुटाणबोरी याने फिर्यादीचे घरात येवुन फिर्यादीचा मोबाईल चोरून नेला. अशा फिर्यादीच्या रीपोर्ट वरून पोलीस स्टेशन भिवापुर कलम ३०५(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद केला होता.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात भिवापुर पोलीसांनी तात्काळ तपास सुरू करत गुप्तबातमीदारांच्या माहीतीच्या आणि तांत्रिक पुराव्यांच्या अधारे दिनांक ०६/०४/२०२६ रोजी अवघ्या १२ तसात आरोपी नामे **आरोपी क्रं १) उत्तम लेकुरवाळे, रा. थुटाणबोरी** यास थुटाणबोरी येथुन ताब्यात घेवुन नमुद आरोपीकडे सखोल आणि कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याबाबत कबुली दिली तसेच सदरचा चोरी केलेला मोबाईल हा भिवापूर येथील **आरोपी क्रं २) प्रकाश नारनवरे यांच्या एक्सेस मोबाईल गॅलरी** येथे अडीच हजार रुपयांमध्ये विकल्याचे सांगितले. **पोलीसांनी आरोपी क्रं १) उत्तम लेकुरवाळे रा. थुटाणबोरी आणि आरोपी क्रं २) प्रकाश नारनवरे, रा. भिवापुर आरोपीतांकडुन गुन्हयात चोरीस गेलाला ओप्पो कंपनीचा मोबाईल किंमती १३,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०२ गुन्हे नोंद. एकुण १०७५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :—** दिनांक ०६/०४/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन कळमेश्वर यांनी अवैधरित्या सट्टापट्टी खेळणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन

सट्टापटट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण १०७५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये एकुण ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत पाटीलचे हॉटेलचे जवळ बाजार चौक कळमेश्वर तसेच बस स्टॉप कळमेश्वरचे बाजूला दर्ग्याचे जवळ कळमेश्वर येथे **आरोपी क्र. १) मुकेश गिरधर ढोले, वय ३८ वर्षे, राह. वार्ड क्रं. ०७, दुर्गा माता मंदीरजवळ, कळमेश्वर २) शुभम अनिल कातकडे, वय २९ वर्षे, राह. वार्ड क्रं. १६, तिखे ले आउट, कळमेश्वर** हे कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतानां मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातून सट्टापट्टी साहित्य व नगदी १०७०/— रूपये असा एकुण १०७५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीतांवर प्रत्येकी १ असे कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदया अन्वये २ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू बाळगुण विक्री करणारे तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०४ गुन्हे नोंद

दिनांक ०६/०४/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू असा एकुण २,१६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन सावनेर येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कोंढाळी येथे आरोपी नामे रमेश महादेव मुगभाते, वय ५८ वर्ष, रा. विकास नगर कोंढाळी याचेवर ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन उमरेड येथे आरोपी नामे वंश सुखदेव तांबे, वय २५ वर्ष, रा. वार्ड नं. २, तारणा याचेवर ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन अरोली येथे आरोपी नामे रामकृष्ण माधोजी निमकर, वय ४८ वर्ष, रा. सिरसोली, ता. मौदा, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद आहे.

**सदर कारवाईत ७११० मिली देशी दारू असा एकुण २१६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७१२ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०७/०४/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७१२ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३५ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३२ आरोपी अशा एकुण ९७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २१ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३१ आरोपी अशा एकुण ११८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण १२६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १५ आरोपी, पोलीस स्टेशन वडोदा येथे ११ आरोपी अशा एकुण ६० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५१ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३३ आरोपी आणि

पोलीस स्टेशन देवलापार येथे २४ आरोपी अशा एकुण १४० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ७७ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३२ आरोपी अशा एकुण १७१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन येथे एकुण ७१२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**





मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने